# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरुवार दि.१६ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २२७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Thrusday 16 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 227 | Pages 4 | Rate 4 Rs


## शिंदे आले आणि म्हणाले एके ठिकाणी जायचेय

**मुंबई–**नाशिकमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भोंदू अशोक खरात भेटीबाबत महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिले असून, हा सर्व प्रकार केवळ अज्ञानातून आणि दीपक केसरकर यांच्या आग्रहामुळे घडल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जेव्हा शिर्डीला आले होते, तेव्हा त्यांना खरातच्या पार्श्वभूमीबद्दल कोणतीही कल्पना नव्हती, असे विखे पाटलांनी सांगितले आहे.राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, एकनाथ शिंदे एके दिवशी आले. ते मला म्हणाले की एके ठिकाणी जायचे आहे. अशोक खरातबाबत माहिती असती तर ते तिकडे गेले असते का? असा सवाल विखे पाटलांनी उपस्थित केला. नाशिकमध्ये ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, अशोक खरात प्रकरणात आम्ही पहिला गुन्हा दाखल केला म्हणून हे प्रकरण उघडकीस आले. अनेक महिला अशोक खरातच्या वलयाला बळी पडल्या.

# राष्ट्रवादीतील नव्या दमाच्या लोकांना पुढे आणणार–सुनेत्रा पवारांची घोषणा

## ‘कार्यकर्त्याला विश्वासात घेऊनच पुढील दिशा ठरविणार’

दैनिक वादळ वार्ता

**बारामती । प्रतिनिधी**

आगामी काळात विकासकामे आणि संघटनात्मक बांधणी करताना प्रत्येक कार्यकर्त्याला विश्वासात घेऊनच पुढील दिशा ठरविली जाईल. कार्यकर्त्यांनी केवळ सतरंज्या उचलायच्या नाहीत, या भावनेला पूर्णविराम देत प्रत्येकाला सन्मान दिला जाईल. नव्या दमाच्या सक्षम लोकांना पुढे आणण्यासाठी ठोस निर्णय घेऊन त्यांना कामाची संधी उपलब्ध करून दिली जाईल, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची आगामी रणनीती स्पष्ट केली. कन्हेरी येथे मारुती रायाचे दर्शन घेऊन बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराचा शुभारंभ नारळ फोडून करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री पवार बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या, बारामतीची पोटनिवडणूक ही ऐतिहासिक जबाबदारी आहे. ती माझ्यासह बारामतीकरांवर देखील आहे. दोन महिन्यांपूर्वी नियतीचा क्रूर खेळ झाला. दादा आपल्याला सोडून गेले, त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अलोट जनसागर लोटला.यावेळी संपूर्ण देशाला दादा काय चीज होते ते समजले. दादांच्या विमान अपघातात विखुरलेले कागदपत्रे त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत असणाऱ्या कार्यमग्नतेचीच साक्ष दिली. दादांनंतर मी घेतलेली जबाबदारी महिला म्हणून पार पाडू शकेल का, असा संशय अनेकांना होता. मात्र,



‘दादां’च्या आशीर्वाद रुपाने ही जनता माझ्यामागे उभी राहिली, मला लढण्याचे बळ दिले. राज्याला पहिले महिला धोरण देणाऱ्या परिवाराची मी सून आहे. महिला म्हणून कोणीही माझ्या कामाचे मूल्यांकन करू नये, असे मला वाटते. दादांच्या निधनानंतर तालुक्यातील यात्रा, जत्रा, उरुस अत्यंत साधेपणाने साजरे झाले. त्यामुळे बारामतीकरांचे नेत्यांविषयी असणारे अपार प्रेम, श्रद्धा दिसून आले. बारामतीकरांच्या या विश्वासाला पात्र राहून ‘दादां’च्या स्वप्नातील बारामती घडविण्यासाठी पूर्ण ताकतीने काम करेन, अशी ग्वाही देते, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या. यावेळी भाषण करताना अजितदादांच्या आठवणींनी मंत्री आदिती तटकरे यांचे डोळे पाणावले. यावेळी आमदार सुनील शेळके, दिलीप वळसे पाटील, सना मलिक, विश्वास देवकाते, भाजपचे अविनाश मोटे आदींची भाषणे झाली. यावेळी जय पवार, रुतुजा पवार, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार शंकर मांडेकर, पृथ्वीराज जाचक, वीरधवल जगदाळे, दिगंबर दुर्गाडे, सचिन सातव, किरण गुजर आदी उपस्थित होते.

# केज पोलिसांची मोठी कारवाई; हॉटेल न्यू शिवनेरी परिसरात अवैध दारू साठ्यावर छापा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मसाजोग परिसरात अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाने मोठी कारवाई केली आहे.या छाप्यात हजारो रुपयांचा देशी–विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहिती नुसार,१४ एप्रिल २०२६ रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.वेंकटराम यांना मसाजोग येथील हॉटेल न्यू शिवनेरीच्या बाजूला असलेल्या पत्रा शेडमध्ये बेकायदेशीर दारू साठा असल्याची गुप्त माहिती मिळाली होती.या माहितीच्या आधारे त्यांनी तात्काळ पथकाला कारवाईचे आदेश दिले.

**पोलिसांची कारवाई आणि जप्त मुद्देमाल**

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील कर्मचारी पोह / ९९६ बाळासाहेब,पोह/१३८४ विकास आणि पोना/१०३५ अनिल यांनी दोन पंचासमक्ष सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी तेथे विक्रीसाठी साठवून ठेवलेला देशी,विदेशी दारू आणि बिअरचा साठा आढळून आला. पोलिसांनी या कारवाईत एकूण १९,८६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**आरोपीवर गुन्हा दाखल**

या प्रकरणी राजेंद्र श्रीमंत पोपळे (रा.मसाजोग,ता. केज) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस हवालदार विकास (बं.नं. १३८४) यांनी दिलेल्या तक्रारी वरून ही कायदेशीर प्रक्रिया पार पडली.

वरिष्ठांच्या मार्गदर्शना खाली सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.वेंकटराम यांच्या नेतृत्वात पार पडली.या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून,अशा कारवाया पुढेही सुरू राहतील असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# धडगाव पोलिसांकडून जप्त दुचाकी चारचाकी वाहनांचा लिलाव

## मालकांना कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी । मोलगी**

धडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या तसेच बेवारस अवस्थेत आढळलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या वाहनांबाबत संबंधित मालकांनी आवश्यक कागदपत्रे सादर करून ती ताब्यात घ्यावीत, अन्यथा लवकरच या वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांनी दिली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, धडगाव पोलीस ठाण्यात गेल्या काही वर्षांपासून विविध प्रकरणांत जप्त केलेल्या सुमारे ११ दुचाकी व ४ चारचाकी वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात पडून आहेत. ही वाहने ऊन, वारा व पावसामुळे खराब होत असून त्यांची किंमतही घटत चालली आहे.यामुळे संबंधित वाहनमालकांनी पुढील सात दिवसांच्या आत पोलीस ठाण्यात येऊन वाहनांचे आवश्यक कागदपत्र सादर करावे व आपली वाहने ताब्यात घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. दिलेल्या मुदतीत कोणीही पुढे न आल्यास संबंधित वाहनांची मालकी हक्काची खात्री करून उर्वरित वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.तसेच जप्त वाहनांचे क्रमांक, चेसिस क्रमांक व संबंधित तपशील धडगाव पोलीस ठाण्यात उपलब्ध असून नागरिकांनी याची नोंद घेऊन तात्काळ संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# हरिभक्त परायण केशवराव पवळे यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्यानिमित्त २५० हून अधिक गावांना विना व गाथा भेट



दैनिक वादळ वार्ता

**हनुमंत चंदनकर । नायगाव**

नांदेडच्या नायगाव नरसी येथील ग्रामपंचायत अधिकारी ह भ प श्री केशव आनंदराव पवळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये नरसी शिवकृपा मंगल कार्यालयात संपन्न झाला कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज ह भ प पुंडलिक महाराजांच्या सुश्राव्य अशा कीर्तनाने झाली यानिमित्ताने हरिभक्त परायण ग्रामपंचायत अधिकारी केशवराव पवळे ज्या गावात आपली सेवा त्या गावांना एक विना गाथा भेट दिली कार्यक्रमासाठी नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र चव्हाण देहू संस्थानाचे सदस्य भाजपाचे श्रावण पाटील भिलवडे ,शिवराज पाटील , भास्कर पाटील भिलवंडे, उद्योजक श्री राहुल पाटील नकाते माणिकराव लोहगावे श्री युवा उद्योजक भास्कर कोकणे नरसीकर तसेच भंडारा डोंगर प्रासादिक दिंडी क्रमांक २१ हावेली पुणे सर्व मान्यवर, बेटकबिलोलीकर मारवाडी कोपरा नायगाव बेटकबिलोली यास अनेक गावातील नागरिक भाविक भक्त टाळकरी माळकरी कीर्तनकार प्रवचन मोठ्या संख्येने उपस्थित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री नकाते सर यांनी केले तर आभार ग्रामपंचायत अधिकारी मुदखेडे साहेब यांनी केले कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलं दिमागदार सेवापूर्ती गौरव सोहळ्याच्या निमित्ताने परिसर झाले होते.

# तुलसी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त आयोजित कार्यक्रमात महामानवाच्या विचारांना उजाळा देत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.जी निकाळजे, प्रा. अर्जुन राठोड यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी पुष्प अर्पण करून महामानवाच्या स्मृतीस वंदन केले.



# गेवराईत भीम जयंतीनिमित्त ’हिमायत फाउंडेशन’चा सामाजिक उपक्रम; पाणी वाटप करून जपली सामाजिक बांधिलकी

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गेवराई शहरात निघालेल्या भव्य मिरवणुकीत भीमभक्तांच्या सेवेसाठी ’हिमायत फाउंडेशन’ सरसावले. फाउंडेशनच्या वतीने मिरवणूक मार्गावर पिण्याच्या पाण्याची मोफत व्यवस्था करण्यात आली होती. रणरणत्या उन्हात मिळालेल्या या शीतल आधारामुळे भीमप्रेमींनी फाउंडेशनचे आभार मानले.

**बाबासाहेबांचे विचार आचरणात आणणे हीच खरी मानवसेवा**

या उपक्रमाबाबत बोलताना हिमायत फाउंडेशनचे सचिव शेख मुजीब म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला समता, बंधुता आणि मानवतेची शिकवण दिली. त्यांचे हे विचार केवळ भाषणातून नव्हे, तर कृतीतून जपण्यासाठी आम्ही ही छोटीशी सेवा केली आहे. समाज म्हणून एकमेकांच्या सुख–दुःखात आणि उत्सवात सहभागी होणे, हीच खरी बाबासाहेबांना मानवंदना ठरेल.



यावेळी फाउंडेशनचे प्रसिद्धीप्रमुख ज्येष्ठ पत्रकार काझी आमान यांच्या मार्गदर्शनाखाली सहसचिव सय्यद शाकेर,सदस्य सय्यद मुदासिर, आमेर चाउस, सय्यद अब्दुल वाहेद, सलमान चाउस, इजहार शेख आणि जिया चाउस यांनी उपस्थित राहून चोख नियोजन केले. मिरवणुकीतील प्रत्येक बांधवाला पाणी मिळेल याची काळजी या सदस्यांनी घेतली.

गेवराईतील या उपक्रमामुळे सर्वच स्तरातून हिमायत फाउंडेशनवर कौतुकाचा वर्षाव होत असून, हा उपक्रम सामाजिक सलोख्याचे एक उत्तम उदाहरण ठरला आहे.

# संपादकीय

## एक होती आशा..

'मेलडी क्वीन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या गायिका आणि विख्यात मंगेशकर कुटुंबातील कनिष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने चित्रपट संगीताचा श्वास थांबला.


मंगेशकर भगिनींचा जन्म सांगलीचा. दीनानाथ मंगेशकर हे त्यांचे वडील. त्यांच्या पश्चात लतादीदींनी संगीत क्षेत्रात पाऊल टाकले. त्यानंतर आशा ताईंचे हिंदी चित्रपट संगीतसृष्टीत आगमन झालं. लता दीदी म्हणजे हिंदी चित्रपट संगीतसृष्टीला पडलेलं सोनेरी स्वप्न होतं तर आशाताई म्हणजे त्याच चित्रपट संगीतसृष्टीला पडलेलं रूपेरी स्वप्न. आशाताईंनी १२ हजार गाणी गायिली. जवळजवळ प्रत्येक गीत हिट या गणतीत जाणारे होते. लता दीदी असोत की आशाताई या दोघींनी जीवनाची प्रदीर्घ वर्षे चित्रपट संगीतसृष्टीत सर्वोच्च स्थान पटकावले. आशा ताईंचा आवाज चिरकाल टिकणारा होता. लता दीदींनी उडत्या चालीची गाणी फार गायिली नाहीत. पण आशाताई उडत्या चालीच्य गाण्यांसाठी, कॅबरे आणि नृत्यगीतांसाठीच प्रसिद्ध होत्या. त्यांनी गीतातील शब्दांशी कधी तडजोड केली नाही. जेव्हा शब्द त्यांना खटकत तेव्हा त्यांनी ते गीतकाराकडून बदलून घेतले. याबाबतीत गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी आशाताईंसाठी लिहीलेले 'पिया तू अब तो आजा' हे गाणे उदाहरणादाखल द्यावं लागेल. यातील शब्द आशाताईंना खटकले तेव्हा मजरूहजींना सांगून त्यांनी ते बदलून घेतलं. तरीही ते गाणे आज आशाताईंच्या गाण्यातील सर्वात गाजलेले गाणे म्हणून गणले जाते. या गीताला त्यावेळी आकाशवाणीवर काही दिवस बंदी होती.

आशा ताईंनी दोन विवाह केले. गणपतराव भोसले हे त्यांचे पहिले पती, तर संगीतकार आर.डी.बर्मन हे दुसरे. त्यापैकी गणपतराव भोसले यांच्याशी विवाह केल्यावर काही काळातच त्यांचा घटस्फोट झाला. पण संगीतकार आरडी बर्मन यांच्याशी त्यांचे संगीत आणि जीवनाचे घट्ट सूर जुळले होते. बर्मन आणि आशाताईंनी अनेक ब्लॉकबस्टर गाणी दिली आणि त्यापैकी अनेक गाणी आजही लोकांच्या ओठांवर आहे. त्यांचं चकाकणारं स्टारडम सगळ्यांनी पाहिलं. मात्र त्यांच्या वेदना कुणालाच दिसल्या नाही. त्यांचं आयुष्य केवळ प्रसिद्धी आणि सुरांनीच सजलेलं नव्हतं, तर त्यामागे वेदना आणि संघर्षाचा एक मोठा काळ होता. आशा भोसले यांनी त्यांच्या जीवनावर आधारित बायोग्राफीमध्ये पहिल्या लग्नात झालेला छळ आणि त्यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रयत्नाबाबत अत्यंत धक्कादायक खुलासे केले आहेत. त्यांना एकूण तीन मुलं होती. यात एक मुलगी आणि दोन मुलांचा समावेश होता. दुर्दैवाने, नियतीने त्यांच्यावर अनेक आघात केले. त्यांची मुलगी वर्षा, जी पत्रकार होती, तिने आत्महत्या केली. तर मुलगा हेमंत भोसले यांचे कॅन्सरसारख्या आजाराने निधन झाले. इतकं दुःख पचवून आशाताई पुन्हा उभ्या राहिल्या. आशा भोसले यांचा संगीतकार ओ. पी. नय्यर आणि आर. डी. बर्मन यांच्याशी असलेला सांगीतिक प्रवास भारतीय चित्रपटसृष्टीतील सुवर्णपान आहे. नय्यर साहेबांनी आशाताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखून अनेक सुपरहिट गाणी दिली. त्यांनी १२ हजारांहून अधिक गाणी गायली असून, सर्वाधिक गाण्यांचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.आशा भोसले यांनी 'उमराव जान' सारख्या चित्रपटातील भावपूर्ण गझलांना आवाज देण्यासोबतच, हिंदी चित्रपटसृष्टीत अनेक आयकॉनिक कॅबरे आणि डान्स नंबर्स (उदा. 'दम मारो दम', 'पिंजरावाली आया') गायली. त्यांच्या आवाजातील अष्टपैलुत्वामुळे हे कॅबरे गाणे त्यांच्या ओळखीचा एक मोठा भाग बनले, ज्यामुळे त्यांना 'कॅबरे क्वीन' म्हणूनही ओळखले जाऊ लागले.आशा ताई यांचे घर संगीताच्या वातावरणाने ओतप्रोत भरलेले होते. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे एक अत्यंत प्रसिद्ध मराठी नाट्यसंगीतकार, शास्त्रीय गायक आणि अभिनेते होते. दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून मिळालेल्या शास्त्रीय संगीताच्या प्रेरणेने त्यांनी आपले गायन कौशल्य विकसित केले. त्यांनी आठ दशकांहून अधिक काळ गायन केले. हिंदी आणि मराठीसह अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहे. त्यांना पद्मविभूषण, दादासाहेब फाळके आणि अनेक फिल्मफेअर पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.पिंजरा, दम मारो दम, ये मेरा दिल आणि इतर अनेक प्रसिद्ध गाण्यांनी त्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केले. त्यांनी वडिलांचे शास्त्रीय संगीत गाण्याचा वारसा पुढे चालू ठेवला आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. आशा भोसले आणि लता मंगेशकर यांच्यातील संबंधांबद्दल अनेक वर्षे चर्चा आणि तर्कवितर्क लढवले गेले. मनोरंजन विश्वात अशा चर्चा होत्या की दोन दिग्गज गायिका एकाच घरात असल्याने त्यांच्यात व्यावसायिक असूया असू शकते. लता मंगेशकर यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला होता. त्यांनी स्पष्ट केले होते की, त्यांच्यात कोणतीही कटुता नाही आणि आशा भोसले या त्यांच्या धाकट्या बहिण आहेत. त्यांचे आपापसात उत्तम संबंध आहेत. त्यानंतर कुणीही ती चर्चा करण्याची हिमत केली नाही. आशाताई लतादीदींना गुरूस्थानी मानत.आशाताई आणि लता दीदी या भारतीय चित्रपट सृष्टीतील दोन सर्वात दिग्गज गायिका. हे नाते केवळ व्यावसायिक स्पर्धा नव्हते, तर ते बहिणींमधील एक भावनिक नाते होते. चित्रपट सृष्टीतील काही लोकांनी त्यांच्यात गैरसमज पसरवून दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, हे आशा ताईंनी एका मुलाखतीत कबूल केले होते. लोक अनेकदा चुकीच्या गोष्टी सांगून तणाव निर्माण करत, पण रक्त हे पाण्यापेक्षा जास्त गडद असते असे सांगून आशा ताई यांनी या बातम्या फेटाळून लावल्या होत्या.अनेक दशकांचा प्रवास, व्यावसायिक स्पर्धा आणि वैयक्तिक आयुष्यातील वादळानंतरही, त्यांचे नाते अखेरपर्यंत टिकून राहिले. आशा ताईंनी गायलेल्या गाण्यांमधील चालींमध्ये एक प्रकारची नजाकत होती. या चालींना आशाताईंच्या सोनेरी आवाजाचा परिस स्पर्श होता. आशा ताई यांनी संगीताच्या क्षेत्रात अष्टपैलुत्व गाजवले आहे. गझलांपासून ते पॉप संगीतापर्यंत आणि भावपूर्ण गीतांपासून ते भजनापर्यंत अनेक प्रकार हाताळले. २०११ मध्ये दिग्गज गायिका आशा भोसले यांची 'सर्वाधिक रेकॉर्डेड गायिका' म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद करण्यात आली.११,००० हून अधिक एकल, युगल आणि कोरस गाणी रेकॉर्ड केल्याबद्दल त्यांना हा बहुमान लंडनमध्ये देण्यात आला होता. आशा ताईंची नोदं क्वीन ऑफ इंडी पॉप आणि टाईमलेस आवाजाच्या मलिका अशी केली जाईल. आशाताईंना विनम्र अभिवादन!

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवनाचे सुधारक व्यक्तिमत्व

भारतातील संपूर्ण दीनदलितांचे जीवन उद्धारक आंबेडकर ह्यांचे समग्र जीवन हे एक महान समाज सुधारक होते. अखंड देशातील दिनदलितांच्या दुःखाला वाचा फोडणारा हा ज्ञानदाता मानव जीवन सुधारक ठरले. ६ डिसेंबर १९५६ साली अखेर हा दीनदलितांचा महासुर्य मावळला. त्यावेळी सारा समाज ध्याय मोकलून रडला. सागराप्रमाणे ज्ञान लाटा घेवून धडकणारे साकगरात विलीन झाले. परंतू जाता जाता असंख्य ज्ञान स्वरुपाचे किरण सोडून गेले.

त्या किरणांच्या साहाय्याने अत्यंत मार्मीक असे ध्येय धाडस निर्माण करून गेले. म्हणून आज हा दुबळा समाज बौध्दजीवी होऊ शकला. अखंड देशसेवेची व समाज सेवेची आस हा दुबळा बाळगून डॉ. आबेडकरांचे मन अहोरात्र मग्न असे बुध्द, कबीर, शाहू, सम्राट अशोक यांच्या स्वप्नातील भारत सत्यसृष्टीत उतरविण्यासाठी जे जे आपल्याला करता येणे शक्य होते ते ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. आपल्या हातून देश व दीन दुबळ्यांची सेवा घडावी त्यांचा उध्दार व्हावा म्हणून त्यांनी आपल्या वैयक्तिक सुख दुःखाकडे कधीच लक्ष दिले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनात आणले असते तर एखाद्या राजपुत्रासारखे सुखासमाधानाचे ऐश्वर्याचे जीवन जगु शकले असते. परंतू त्यांना हे मान्य नव्हते. देशातील कोटी कोटी दीनदलितांची, कष्टकरी कामगार माणसाची हाक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. या देशातील असंख्य गोरगरिब दलित आपल्या घामावर जगत असून भारतभूमीच्या मातीतून सोने पिकविण्यासाठी उन्हातानात पाऊसवा-यात वाट काढत विद्रुप जीवन जगत आहेत. जणू आपल्याला ही माती साद घालत आहे असे त्यांना नेहमी वाटत असून समाजासाठी पत्करलेला जीवन संघर्ष ऐन तारुण्यात आपली प्रिय पत्नी श्रीमती रमा हीने आयुष्याच्या अर्ध्या वाटेवरच सोडून गेल्याचे दुःख ते पार विसरुन गेले होते. तन-मन धनाने, अधिक जोमाने अधिक ताकदिने त्यांनी स्वतःला समाज झोकून घेतले.स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतात का थोडी जातीय भेदाभेद झाली आणि होत आहेत.जातीय भेदाभेदींचे हे होमकुंड सलग पेटतच आहे.रक्तपात चालूच आहे.माणूसाची भौतिक प्रगती होत असली तरी देशातील माणसाची ही युध्दनिती वरचेवर बळवत आहे.याबद्दल डॉ.आंबेडकरांना अतिशय दुःख होत असे.अशा जाती युध्दाने रक्तपाताने माणसाचे प्रश्न सुटत नाहीत.ते वाढतातच आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून त्यांनी भारतातील संपूर्ण समाजाला बुध्दाचा शांतीचा संदेश दिला. ह्या देशातील गरीब, दीनदलित बळकट होऊन समाजाची एकता आणि अखंडता टिकावी म्हणुन खुप प्रयत्न केले. धर्म, जात, पंथ भाषा आदी माणसातील भेद, तात्कालिन आणि कुत्रित स्वरुपाचे मानुन कुठल्याही स्वरुपाचा कलह हा सर्व वर्ज्य मानला व समता आणि बंधुता या तत्वांचा पुरस्कार करुन माणसाचा सर्वांगीण प्रगतीचा पाठपुरावा केला म्हणून त्यांना दलितांचा उध्दारता असे म्हणतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ राजकारणी पुरुषच नव्हते तर ते एक इतिहास तज्ज्ञ ही होते माणसाच्या झानवी जीवनाचा चढ-उतार त्याच्या आशा आकांशा जगविण्यासाठी मागची एक कठोर जिद्द आणि यशापयश यासांरख्या कितीतरी गोष्टींच ज्ञान आपल्याला इतिहासावरुन होते. इतिहासासारखा थोर शिक्षक, मार्गदर्शक दुसरा नाही, असे डॉ. आंबेडकरांचे मत असले तरी आपला इतिहास डॉ. आंबेडकर होऊ शकतात.ज्या भारतीय संस्कृतीत डॉ. आंबेडकर जन्मले, आणि त्या मातीने त्यांना घडविले तिच्याबद्दल त्यांच्या मनात अफाट प्रेम असून नसल्यासारखे होते. शेकडो वर्षापासून चालत आलेल्या भारतीय परंपरेचा आणि संस्कृतिचा त्यांना मुळीच आदर वाटत नसे. रामायण, महाभारत, वेद, पुराण यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्याच्या उदार तत्वप्रणालीचा कधीच स्वीकार केला नाही. सामान्यतः बालपण, तारुण्य आणि वार्धक्य है मानवी जीवनाचे तीन महत्वाचे आणि ठळक टप्पे आहेत.



नासिकेत कृष्णकांत पानसरे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, महाराष्ट्र शासन सन्मानित
९९३०९९८९७८

जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला याच टप्प्याटून प्रवास करावा लागतो.पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखी माणसे याला अपवाद असतात.पण डॉ. आंबेडकरांसारखी माणसे शेवटच्या क्षणापर्यंत उत्साह आणि जोम हा पंचविशीतल्या तारुण्यालाही लांगवेल असा होता. जगत ते तरुण राहीले. मुलात मुल झाले. विद्ववानात विद्ववान झाले. लाजवेल असा होता. शेवटपर्यंत बालपणाच्या कडू अनुभव जपत तरुणात तरुण झाले पण वृद्धांत वृध्द कधीय झाले नाहीत. मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे. ते कधी संपेल त्याचा नेम नाही. तेव्हा आपण जीवंत आहोत तो पर्यंत का काफलाओढायाचा. जीवन ताजे व तरतरीत व्यक्तिमत्व लाभेलल्या डॉ. आंबेडकरांना आपल्या हाती नेहमी ग्रंथ पुस्तके ठेवण्याचे काय कारण होते. आजही त्याची आठवण झाली की त्याच नितळ पारदर्शी लोभस असे व्यक्तिमत्व आपल्या डोळ्यापुढे साकारत ते त्या ग्रंथालयात त्यांची लिहिलेली पुस्तके बघितल्यावर जणू पुस्तके व ग्रंथ आणि डॉ. आंबेडकर हे दोन्ही एकच होते. त्यांना एकमेकांपासून वेगळ असं काढता येतच नाही. डॉ. आंबेडकरांपासून पुस्तके, ग्रंथ वेगळे काढले तर डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाला परिपूर्णताः येत नाही. त्यामुळे डॉ.आंबेडकर आणि ग्रंथ पुस्तके ग्रंथ बाजूला काढले तर डॉ.आंबेडकरांचे व्यक्तिमत्व ओक-बोक दिसायला लागते.आयुष्यभर मोठ्या दिमखाने डौलाने डॉ. आंबेडकर या पुस्तकाला आपल्या हातात घेवून छातीला लावत फिरले, त्यांना काय सांगायचे होते या कृतीतून या समाजाला कधी कळलेच नाही. येथे पुस्तकाला महत्व आहे आणि डॉ. आंबेडकरांना तर आहेच आहे. या सहचार्यातुन डॉ. आंबेडकरांचे चिरतारुण्याचे रहस्य उलगडायला ब-याच प्रमाणात मदत होते. गुलाबाच्या फुलाबरोबर काटेही असतात तरीही तो सर्वत्र सुगंध पसरवतो. माणसेही आपल्या अविरत

परिश्रमाने अनेक संकटांना तोंड देत आपल्या कर्तुत्वाने जीवनात सुगंध पसरवावा हे जीवन अधिक सुंदर सुशोभित व सुगंधित करावे, वयाची ५० ओलांडल्यावरही दिवसाकाळी पंधरा व अठरा तास वाचत, लिखाण करणा-या डॉ. आंबेडकरांना पुस्तके व ग्रंथामधुन वेगळे असे काय सांगायचे होते. हे आम्ही समजून घेतले पाहिजे.मातून त्यांचे सौदर्यपूजक रसिक मन जसे स्पष्ट होते तसेच एकूण मानवी जीवनावर त्यांचे अपार प्रेम व्यक्त होत असे. विश्वास असल्याशिवाय कोणीही एखादी सुंदर वस्तु उभारु शकणार नाही. अशा डॉ. आंबेडकरांचा दृढविश्वास असलेला दिसतो. स्वतःवरील विश्वास व हिंमती शिवाय कोणतीही गोष्ट मोठी नाही. जीवनावर ज्याचा विश्वास नसतो त्याला सर्वत्र कुरुपताच दिसते. जो जीवनावर प्रेम करतो तोच काही तरी निर्माण करू शकतो. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवनात प्रेम केले होते. परंतू देशावर व समाजावर खूप प्रेम केले आहे, हे आपले ज्ञानदाता जीवन उध्दारते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त विनम्र अभिनंदन

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहा निमित्त महिला मेळावा व पुरस्कार वितरण कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
**वसमत । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त (८ ते १४ एप्रिल २०२६) आयोजित 'सामाजिक समता सप्ताहा' अंतर्गत वसमत तालुक्यातील सावित्रीबाई फुले मुलींच्या वस्तीगृहात १२ एप्रिल रोजी महिला मेळावा व संविधान जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाचा उद्देश महिलांना शासकीय योजनांची माहिती देणे, डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे आणि समाजात समता प्रस्थापित करणे हा होता. कार्यक्रमात संविधान वाचन, प्रबोधनात्मक व्याख्याने तसेच सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.समाज कल्याण विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात स्थानिक महिला, स्वयं सहाय्यता गट व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. महिला हक्क, शिक्षण, आरोग्य व आत्मनिर्भरता या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास मा. श्रीमती गीता गुट्ठे मॅडम समाज कल्याण सहाय्यक आयुक्त अधिकारी, श्रीमती रावतळे मॅडम, उत्तजेका मॅडम, श्रीमती श्रीमती तांबळे मॅडम (भा.ज.प. जिल्हाध्यक्ष) .श्रीमती जोशी मॅडम (मुख्याध्यापिका), श्रीमती डॉ. काळे मॅडम. (सरकारी दवाखाना) श्रीमती मनोहरे मॅडम (नगरसेविका), श्रीमती मुंडे मॅडम (पोलीस कर्मचारी) व श्रीमती हाटकर मॅडम (मुख्याध्यापिका) कार्यक्रमास शिल्पा वाघमारे (गृहपाल), सोनटक्के सर गृहपाल मिलिंद आळणे सर समतादूत, गुरुनाथ गाडेकर सर बार्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा वाघमारे मॅडम यांनी केले, प्रस्तावना हाटकर मॅडम यांनी मांडली तर समारोप काजल जगताप व गाडेकर सर यांनी केला.यावेळी सामाजिक कार्याबद्दल मिलिंद आळणे यांचा इंडियन सोशल सोशल आयकॉन अवॉर्ड राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच गव्हाणे मॅडम यांना 'नारीशक्ती पुरस्कार' देऊन . सन्मानित करण्यात आले.

हा सामाजिक समता सप्ताह सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यभर साजरा करण्यात येत असून, महिलांमध्ये हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# सुनिर्मल फाऊंडेशनच्या वतीने धारावीत अनोख्या पद्धतीने भीम जयंती साजरी !

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

१४ एप्रिल २०२६ रोजी सुनिर्मल फाऊंडेशन आणि सा. भगवे वादळ च्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त 'शैक्षणिक साहित्य वाटप' तसेच तेजस्विनी पंडित लिखित 'इंग्रजी माझ्या खिशात'या पुस्तकाचे वाटप करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ अर्चनाताई शिंदे (नगरसेविका), श्री महादेव शिंदे (उपविभाग प्रमुख शिवसेना धारावी), श्री दिलीप गाडेकर (सामाजिक कार्यकर्ते) आणि शब्दश्री विलास देवळेकर (साहित्यिक व कवी) उपस्थित होते. मा. नगरसेविका अर्चनाताई यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, अभिवादन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला देवळेकर लिखित भीम वंदना घेण्यात आली. त्या नंतर देवळेकर रचित डॉ. बाबासाहेब प्रतिज्ञा उपस्थितांना देण्यात आली. त्या नंतर कवयित्री सौ विमल गजरेताई यांनी भीम गीत सादर केले आणि शेवटी देवळेकर यांनी डॉ. बाबासाहेब यांनी वापरलेल्या वस्तू वर कविता सादर केली. कार्यक्रमाची 'प्रस्तावना' आयोजक दत्ता खंदारे यांनी केली.त्या वेळी मोठे बंधू सुनील खंदारे यांचे स्मरण होताच ते भावूक झाले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साप्ताहिक भगवे वादळचा विशेषांक प्रकाशित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.धारावी चे सामाजिक कार्यकर्ते दिलीप गाडेकर यांनी दोन्ही संघटनेचे कौतुक केले. तसेच महादेव शिंदे यांनी दत्ता खंदारे यांच्या सुरुवातीपासूनचा कार्याचा पाढाच वाचला. ते ऐकून सर्व उपस्थितांनी खंदारे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव टाळ्यांचा गजरात' केला. आणि नगरसेविका अर्चनाताई यांनी सर्व उपस्थित शालेय ते प्रौढ विद्यार्थीचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या हस्ते 'शैक्षणिक साहित्य' वाटप करण्यात आले. यावेळी स्थानिक रहिवासी आणि सामाजिक कार्यकर्ते गिरीराज शेरखाने,प्रतिक्षा नगरचे सामाजिक कार्यकर्ते संजय चव्हाण, राम म्हस्के, भावेश खंदारे, रेखा सदाफुले आवर्जून उपस्थित होते.तसेच धारावी पोलीस पंचायत बिट क्रमांक २चे सर्व सभासद उपस्थित होते.देवळेकर लिखित डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आद्याक्षराने ६ फुट कविता फ्लॅक्स सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. अशा प्रकारे, खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'विचारांची जयंती' साजरी करण्यात आली.





# जगाला फक्त तथागतांचे विचारच वाचवू शकतात विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार

## रूई येथे बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना व भीम जयंती सोहळा

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

तथागत गौतम बुद्ध यांचे विचार सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजले. त्यांनी बुद्धांच्या समतेच्या, मानवतेच्या आणि बंधुत्वाच्या शिकवणीचा सखोल अभ्यास करून तो विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे ऐतिहासिक कार्य केले.आजच्या काळात जगभर अस्थिरता, संघर्ष, जातीय तेढ आणि विषमता वाढताना दिसत आहे. अशा परिस्थितीत मानवतेचा मार्ग दाखवणारे तथागत बुद्धांचे विचारच जगाला वाचवू शकतात, असे बहुमोल विचार विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते,आमदार वडेट्टीवार यांनी मांडले.ब्रम्हपुरी तालुक्यातील रूई येथे भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ देवेश कांबळे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, भंतेजी राहुल बोधी, भंतेजी आनंद, भंतेजी सारी पुत्र, भंतेजी मोगलाराम, उत्तम बनकर, अण्णा ठाकरे, देवचंद ठाकरे, जयकुमार मेश्राम, अनिल थूल, ॲड दिनेश लोखंडे, ज्ञानेश्वर लोखंडे, अशोक मेश्राम यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, शूद्र आणि वंचित समाजाला मिळणारी अन्यायकारक वागणूक पाहून बाबासाहेब अत्यंत अस्वस्थ झाले होते. समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य संघर्षात घालविले. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी लाखो लोकांना



स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखविला. शांतता, करुणा, प्रेम, समता आणि बंधुभाव या मूल्यांची आज जगाला सर्वाधिक गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा उल्लेख करताना ते म्हणाले की, बाबासाहेब जर जन्माला आले नसते तर आपल्या समाजाचे काय झाले असते, याची कल्पना केली तरी अंगावर काटा उभा राहतो. त्यांनी वंचित, शोषित, पीडित आणि दुर्लक्षित समाजघटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संविधानाच्या माध्यमातून देशाला नवी दिशा दिली. त्यांच्या कार्यामुळेच आज समाजातील अनेक घटक सन्मानाने जगत आहेत असेही ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तम बनकर यांनी तर सूत्रसंचालन प्यारेलाल बनकर यांनी केले.कार्यक्रमादरम्यान बुद्ध मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी जयभीम, नमो बुद्धायच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. कार्यक्रमाला विविध गावांतील समता सैनिक दलाच्या महीला, पुरूष व गावकरी मंडळी उपस्थित होते.

# विहिरीत उतरून वाचवला जीव भांदक प्रेस क्लबकडून गौरव

दैनिक वादळ वार्ता

**भद्रावती । प्रतिनिधी**

माणुसकीची उब अजूनही जिवंत असल्याचे जिवंत उदाहरण मागील शनिवारी सकाळी भद्रावती शहरातील शिवाजीनगर परिसरात पाहायला मिळाले. एका ७५ वर्षीय वृद्धाचा जीव धोक्यात असताना, क्षणाचाही विलंब न करता स्वतःचा जीव धोक्यात घालून विहिरीत उतरलेल्या वसीम रहमान सय्यद यांनी दाखवलेल्या धाडसामुळे एक मौल्यवान जीव वाचला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती. संबंधित वृद्ध इसम अचानक विहिरीत पडल्याने परिस्थिती गंभीर बनली होती. विहिरीत चिखल असल्यामुळे त्यांना बाहेर येणे अशक्य झाले होते. अशा वेळी सामाजिक कार्यकर्ते सुरज शाहा घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखत तात्काळ मदतीचे आवाहन केले. यावेळी वसीम रहमान सय्यद यांनी कुठलाही




विचार न करता मदतीसाठी पुढे येत धाडसी निर्णय घेतला. त्यांनी अत्यंत शांतपणे आणि शिताफीने विहिरीत उतरून त्या वृद्धाला सुरक्षित बाहेर काढले. त्यांच्या या कृतीमुळे केवळ एक जीव वाचला नाही, तर समाजात माणुसकीचा दीपही अधिक तेजाने प्रज्वलित झाला. या घटनेनंतर परिसरात वसीम सय्यद यांच्या धैर्याचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. संकटाच्या काळात धावून जाणारी अशी माणसे समाजासाठी प्रेरणादायी ठरतात, असे मत नागरिकांनी यावेळी व्यक्त केले. दरम्यान, या उल्लेखनीय कार्याची दखल घेत भांदक प्रेस क्लबच्या वतीने रविवारी सुरज शाहा आणि वसीम रहमान सय्यद यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या सत्कार सोहळ्याला प्रेस क्लबचे पदाधिकारी अब्बास अजाणी, अशोक पोतदार,वतन लोणे, ईश्वर शर्मा,सुनिल पतरंगे, सुधीर पारधी सुनिल बिपटे, डॉ. यशवंत घुमे, यांच्यासह अफजल शेख, इमरान शेख आदी मान्यवर नागरिक उपस्थित होते. या प्रसंगी अब्बास अजाणी यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, अशा धाडसी आणि निःस्वार्थ कृतींमुळे समाजात सकारात्मकता निर्माण होते. आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जीवनशैलीतही काही माणसे इतरांच्या जीवासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालतात, हीच खरी मानवतेची ओळख आहे.ही घटना केवळ एका जीवाच्या बचावाची नाही, तर समाजात अजूनही जिवंत असलेल्या माणुसकीच्या भावनेची साक्ष देणारी आहे. वसीम सय्यद आणि सुरज शाहा यांच्यासारख्या नागरिकांमुळेच समाज अधिक संवेदनशील, सुरक्षित आणि प्रेरणादायी बनतो, हेच या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

# रणमोचन फाट्याजवळ रुग्णवाहिकेचा अपघात; चालक जखमी,जीवितहानी टळली

दैनिक वादळ वार्ता

**ब्रह्मपुरी । प्रतिनिधी**

ब्रह्मपुरीपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या गांगलवाडी टी-पॉईंट (रणमोचन फाटा) परिसरात रविवारी (दि. १२ एप्रिल) रात्री ८.१५ वाजताच्या सुमारास रुग्णवाहिकेचा अपघात झाल्याने एकच खळबळ उडाली. या अपघातात रुग्णवाहिका चालक किरकोळ जखमी झाला असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.मिळालेल्या माहितीनुसार, याच परिसरात यापूर्वी एका स्कार्पिओ वाहनाने पोलीस अधिकाऱ्याला धडक दिल्याची घटना घडली होती. या अपघातातील जखमींना आणण्यासाठी स्थानिक पोलिसांनी खाजगी रुग्णालयाची रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवली होती. मात्र, गंभीर जखमी असलेले हेमके मेजर यांना दुसऱ्या रुग्णवाहिकेतून ब्रह्मपुरी येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले.दरम्यान, संबंधित रुग्णवाहिका परत येत असताना अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन पलटी झाले. त्यामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण





निर्माण झाले.अपघाताच्या वेळी रुग्णवाहिकेत चालकाव्यतिरिक्त अन्य कोणीही नव्हते. चालकाला किरकोळ दुखापत झाली असून त्याला तातडीने उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले.घटनेनंतर मार्गावरून जात असलेल्या पोलिसांच्या वाहनाने अपघातग्रस्त रुग्णवाहिका पाहताच तात्काळ मदतकार्य सुरू केले. पोलिसांनी जखमी चालकाला स्वतःच्या वाहनातून रुग्णालयात दाखल केले.दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

# मेंटल हेल्थ व सायक्रॅटिक डिसऑर्डर ग्रंथाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विमोचन

दैनिक वादळ वार्ता

**वर्धा । प्रतिनिधी**

मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविणाऱ्या मेंटल हेल्थ व सायक्रॅटिक डिसऑर्डर या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे विमोचन महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. या ग्रंथाच्या लेखिका डॉ. विजयता विटणकर - वंजाळकर असून त्या डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्या रातुम नागपूर विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यास मंडळाच्या सदस्य आहेत.सदर ग्रंथामध्ये सध्याच्या काळात वाढत चाललेल्या मानसिक आजारांचे स्वरूप, त्यामागील कारणे व त्यावर उपाययोजना यांचा सखोल ऊहापोह करण्यात आला आहे. चिंता, भीती, व्यक्तिमत्व विकार,



निद्रानाश, आत्महत्येची प्रवृत्ती, ओसीडी, स्किझोफ्रेनिया यांसारख्या गंभीर मानसिक विकारांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तसेच मानसिक रुग्णांचे पुनर्वसन, त्यांच्या संविधानिक हक्कांबाबत जागरूकता, तसेच मनोचिकित्सक, समुपदेशक आणि समाजकार्यकर्त्यांची भूमिका यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे.


माननीय मुख्यमंत्री फडणवीस यांनी या ग्रंथाची सध्याच्या परिस्थितीत असलेली उपयुक्तता अधोरेखित करत लेखिकेचे विशेष कौतुक केले. संशोधक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य वाचकांसाठी हा ग्रंथ मार्गदर्शक ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमास रोड मार्क फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राजेश वाघ उपस्थित होते. ग्रंथाचे प्रकाशन अथर्व प्रकाशन, जळगाव यांनी केले असून समाजाच्या विविध स्तरांतून या ग्रंथाचे स्वागत करण्यात येत आहे.

# आर्ट्स अँड कॉमर्स नाईट कॉलेज मध्ये महात्मा फुले जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर । प्रतिनिधी**

समाजसुधारक, बुद्धिप्रामान्यवादी, शैक्षणिक उद्धीष्टांचे पुरस्कर्ते महात्मा फुले यांच्या जयंतीच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. त्यानंतर, शिक्षण, सामाजिक न्याय आणि समाजातील वंचित घटकांच्या उत्थानासाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाला अधोरेखित करणारी आदरांजली विनम्रतेच्या भावना अर्पित करून महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी त्यांना विनम्र अभिवादन केले, तसेच आधुनिक काळातही त्यांच्या आदर्शांचे महत्त्व आणि प्रासंगिकता कायम असल्याचे आपल्या भाषणांतून स्पष्ट केले.या कार्यक्रमाला प्रमुख



पाहुणे म्हणून प्रा. राजेश अंधारे यांची उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून राष्ट्रनिर्मितीमध्ये शिक्षण आणि सामाजिक समानतेचे असलेले महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिरालाल मेश्राम यांनी भूषविले; त्यांनी विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांची मूल्ये आणि शिकवण आपल्या जीवनात अंगीकारण्यासाठी प्रोत्साहित केले.द्यानगंगेच्या प्रवाह जोपासत या कार्यक्रमाचे एक विशेष आकर्षण म्हणजे महाविद्यालयातील दोन प्राध्यापकांनी लिहिलेल्या प्रा. हरामी आणि प्रा. सोनकुसरे यांनी पुस्तकांचे प्रकाशन आणि अनावरण होय. शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी आणि संशोधनामध्ये दिलेल्या योगदानाची दखल घेत, उपस्थित मान्यवर आणि श्रोत्यांनी या यशाचे भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वृषभ येरणे आणि आभार प्रा. सुजित जाधव यांनी मानले.

# 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाची जिल्हास्तरीय कार्यशाळा




दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आरोग्य हा विषय नागरिकांच्या केंद्रस्थानी यावा, याबाबत चर्चा व्हावी तसेच नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा घेण्यात आली .कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमख अतिथी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, माता बाल संगोपन अधिकारी मोहनीश गिरी आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सिंह म्हणाले, १ एप्रिल २०२६ पासून हे अभियान राबविण्यात येत असून वर्षभर ते सुरू राहणार आहे. आरोग्याच्या बाबतीत नागरिकांमध्ये सजगता निर्माण होण्यासाठी हा अतिशय महत्वाचा उपक्रम आहे. ग्रामविकास विभागाच्या वतीने 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान' राबविण्यात आले. त्याच धर्तीवर आता आरोग्य विभागाने पुढाकार घेऊन 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान हाती घेतले आहे. गावस्तरावरील सर्व यंत्रणांचा तसेच लोकांचा सहभाग यात अतिशय महत्वाचा आहे. अभियानाची उद्दिष्टपुर्ती आणि प्रभावी अंमलबजावणी लोकसहभागातूनच पूर्ण होणार असून त्यांच्याच सहकार्याने संपूर्ण चंद्रपूर जिल्हा आपण आरोग्य संपन्न करू, अशी अपेक्षा श्री. सिंह यांनी व्यक्त केली.प्रास्ताविकात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कटारे म्हणाले, आरोग्याबाबत जनतेमध्ये चर्चा होणे गरजेचे झाले आहे. हा एक नियमित उपक्रम असला तरी लोकसहभाग आणि आंतरविभागीय समन्वय आवश्यक आहे. या मोहिमेमध्ये संसर्गजन्य आजार, असंसर्गजन्य आजार, जलजन्य आजार, किटकजन्य आजार याबाबत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करावयाची आहे. यात लोकांचा सहभाग, इतर विभागाशी प्रशासकीय समन्वय, शेवटच्या घटकांपर्यंत नवीन उपक्रम आणि परिणामकारक मुल्यमापन हे घटक महत्वाचे आहेत.जिल्हास्तरावर दोन महिन्यातून एकदा तर ग्राम आणि तालुकास्तरावर महिन्यातून एकदा याचा आढावा घेण्यात येईल. या अभियानांतर्गत राज्यस्तरावर पाच कोटी, विभागीय स्तरावर तीन कोटी तर जिल्हास्तरावर दोन कोटींचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे पुराव्यासह यात मुल्यमापन होणार असल्याचे डॉ. कटारे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे संचालन माता बाल संगोपन अधिकारी मोहनीश गिरी यांनी केले. कार्यक्रमाला सर्व गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक, समुदाय आरोग्य अधिकारी, तसेच जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

# युगप्रवर्तक चषक-२०२६ बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न;पोलीस प्रशासनाचा दिमाखदार विजय!

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

युगप्रवर्तक चषक २०२६ या प्रतिष्ठित क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला असून, यंदाच्या स्पर्धेत पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या नेतृत्वात पोलीस प्रशासनाच्या संघाने शानदार कामगिरी करत चषकावर आपले नाव कोरले. ही स्पर्धा यंदा बाराव्या वर्षात पदार्पण करत असून, कर्मचारी वर्गासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांच्या वतीने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. कर्मचारी वर्गातील क्रीडागुणांना वाव देणे, शारीरिक तंदुरुस्ती वाढवणे आणि एकात्मता दृढ करणे हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेत केवळ कर्मचारीच सहभागी होत असल्याने तिची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. यंदाच्या स्पर्धेत शहर व परिसरातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतील एकूण सहा संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. संपूर्ण स्पर्धेदरम्यान पोलीस प्रशासनाच्या संघाने शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत इम्रान नाईक यांच्या नेतृत्वातील आय. के. एन. या बल्लाढ्य समजल्या जाणाऱ्या संघावार मात केली. आणि विजेतेपद पटकावले. बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या पोलीस प्रशासनाच्या संघाला युगप्रवर्तक चषक २०२६ प्रदान करण्यात आला. तसेच स्पर्धेतील सामनाविराचा मान ओंकार थेटे यांनी, बेस्ट बॅटसमन पोलीस निरीक्षण राहुल सूर्यतळ यांनी व बेस्ट बॉलर सचिन मंजुळे यांनी पटकावला. विजेते व उपविजेते संघातील खेळाडूंना ट्रॉफी, सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी



अमोल राऊत, डॉ.श्रीराम खळगे, जीवन नखाते, अमोल गायकवाड, परमेश्वर पांचाळ, प्रभाकर साळवे, गोरख उघडे, ममताजी गायकवाड, नितीन पुटवाड, शेख सलीम व संपूर्ण सामन्याची पंचगिरी अबू शेरा व ढकलू यांनी करून विशेष सहकार्य केले.

या स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा प्रमुख शेख मतीन व नितीन पुटवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार होते. कार्यक्रमाचे संचालन नारायण भाळशंकर यांनी सर प्रास्ताविक भारतभाऊ टाकणखार यांनी केले. कार्यक्रमास बाळासाहेब सोनसळे सतीश डोने, प्रमोद साळवे, आनंद गायकवाड, प्रा.रोहित शेटे, डॉ.सुहास टाकणखार, पत्रकार विष्णू उगले, परमेश्वर सोळंके, बालासाहेब आडगळे तसेच सर्व सहभागी खेळाडू, पोलीस आदींची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे कर्मचारी वर्गात एकजूट,शिस्त आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे मत व्यक्त केले. युगप्रवर्तक चषक स्पर्धेमुळे शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असून, भविष्यातही अधिक मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आयोजित करण्याचा संकल्प आयोजक वसंतभाऊ टाकणखार, शिवाजी भाळशंकर, अभिमन्यू इबिते, राजकुमार सोनवणे, किरण शिंदे, प्रवीण जाधव, राजेंद्र सातपुते, राहुल खुणे, निलेश गावडे, अमोल राऊत, अजमुद्दीन खतीब, सुमेध घाडगे, प्रतीक स्वामी यांनी व्यक्त केला.

# बहुजन जेष्ठ नागरिक मंच केजच्या वतीने एक्कागाई पाणपोईचे उद्घाटन संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बहुजन क्रांती मोर्चा व झोपडपट्टी हक्क संघर्ष समिती,तसेच बहुजन जेष्ठ नागरिक मंच,केज यांच्या वतीने गेल्या तीन वर्षापासुन केज शहरात महात्मा ज्योतिबा फुले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर,व सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त बाबुराव गालफाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली इरफान पठाण,अनिल लोखंडे, अजय गालफाडे,वैजनाथ क्षिरसागर,शहाजी जाधव सर,दगडू तात्या गालफाडे,सिताराम वैरागे,अमोल मस्के, बाळासाहेब गालफाडे, भिमराव हजारे,मनोहर गालफाडे,गंपू मस्के, दासराव कसबे,अर्जुन शिंदे इत्यादी युवा कार्यकर्ते यांनी सहकार्य केले आहे.या पाणपोईचे उद्घाटन केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा डॉ.सौ.सिताताई बनसोड तसेच जनविकास फाउंडेशन चे प्रमुख हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.पाणपोई चालू केल्याबद्दल नगराध्यक्षा डॉ.सौ.सिताताई बनसोड यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.व धन्यवाद दिले आहेत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानावर देश चालतो हि बाबासाहेबांची महानता-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या व सर्वांना समान अधिकार एक व्यक्ती एकच मताची तरतूद घटनेत केलेल्या याच घटनेवर देश चालतो हि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची महानता आहे असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड येथे १४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान,वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, रंगभरण स्पर्धा,ग्रंथवाचन आदी कार्यक्रम घेण्यात आले.अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा



गायकवाड हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड बोलत होते.सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले.

त्यानंतर एस.के.वैरागे, माजी सरपंच रामराजे गायकवाड,ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.त्यानंतर ग्रंथवाचन घेण्यात आले. ऋषीकेश गायकवाड, सुशांत सौदागर,बालाजी टिंगरे,यशवंत सौदागर यांनी ग्रंथवाचन केले. रंगभरण स्पर्धेत यशवंत सौदागर,सुशांत सौदागर, बालाजी टिंगरे यांनी विशेष प्राविण्य मिळविले वक्तृत्व स्पर्धेत यशवंत सौदागर,सुशांत सौदागर, बालाजी टिंगरे यांनी विशेष प्राविण्य मिळविले,कथाकथन स्पर्धेत यशवंत सौदागर, बालाजी टिंगरे,सुशांत सौदागर यांनी विशेष प्राविण्य मिळविले.ग्रंथ प्रदर्शनात दादासाहेब गायकवाड,ए.बी. गायकवाड,प्रकाश गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड,शिवम गायकवाड,माऊली कदम,माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड यांच्यासह मोठया संख्येने विद्यार्थी,वाचक सहभागी झाले.सर्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड व डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवाजीराव गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. सकाळी ८ ते रात्री ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले. शेवटी अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कानडीमाळी शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.१४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कानडी माळी या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.गिरी सर,उपाध्यक्ष शाळेच्या आदर्श शिक्षिका श्रीमती दुबाले मॅडम या होत्या. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती जाधव मॅडम,चाटे मॅडम, देशमुख मॅडम,थाटकर मॅडम,शेलार मॅडम व घाडगे मॅडम यांनी प्रयत्न केले.जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार विद्यार्थ्यां मध्ये रुजावे यासाठी भाषण स्पर्धा घेण्यात



आली.इयत्ता पाचवीच्या मुलांनी बाल सभेचे आयोजन केले होते. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गीतावर मुलांनी ठेका धरला.श्रीमती चाटे मॅडम व गिरी सर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.अशा प्रकारे अतिशय उत्साही वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी सेवाभावी तंत्रज्ञ गजानन मुंडे यांचा भव्य सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील शुक्ल तीर्थ, लिमगाव येथे दि. १४ एप्रिल रोजी यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात व अभिमानाने साजरी करण्यात आली. गावातील नागरिकांनी एकत्र येत सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडला.

यावेळी जयंतीनिमित्त एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. गेल्या तीन ते चार वर्षांपासून दिवस-रात्र न थकता वीज सेवा देणारे महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ गजानन मुंडे यांचा ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. त्यांना स्मृतिचिन्ह, हार, शाल व श्रीफळ देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या सेवेमुळे गावातील




वीज समस्या मोठ्या प्रमाणात सुटल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सचिन उजगरे, गावाचे सरपंच कृष्णा थावरे तसेच ग्रामपंचायत सदस्य सिद्धार्थ पोळ, विवेक पोळ, वैभव वगरे, प्रकाश खडूळ, विष्णू शेरकर, मुंजा पांचाळ, नवनाथ आदमाने, नारायण पांचाळ, ओमप्रकाश गुंगेवाड यांच्यासह गावातील मित्रमंडळी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून समाजात शिक्षण, समानता व बंधुता यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच समाजासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे हीच खरी जयंती साजरी करण्याची पद्धत असल्याचे मत व्यक्त केले.

सत्कारामुळे भावूक झालेल्या गजानन मुंडे यांनी सर्व ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानत, भविष्यातही अशीच सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# बीड शहरात दलित पँथरच्या वतीने भीमजन्मोत्सव उत्साहात साजरा




दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात विविध जयंती उत्सव समित्यांच्या मिरवणुका मोठ्या उत्साहात पार पडल्या. या पार्श्वभूमीवर दलित पँथरच्या वतीने शहरातील सर्व जयंती उत्सव समित्यांचे सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य व परस्पर सन्मानाची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी मिरवणुकीत सहभागी झालेल्या विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानपत्र देऊन त्यांचे कौतुक केले. तसेच, कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व पोलीस बांधवांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले. यावेळी पत्रकार, संपादक बांधव आणि सामाजिक कार्यकर्त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

हा संपूर्ण भीमजन्मोत्सव कार्यक्रम दलित पँथरचे बीड जिल्हाध्यक्ष भाई धम्मानंद वाघमारे तसेच युवा जिल्हाध्यक्ष भाई प्रेम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी संघटितपणे काम करत कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली.

या उपक्रमामुळे शहरात एक सकारात्मक संदेश गेला असून, समाजातील विविध घटकांमध्ये बंधुभाव आणि एकात्मतेची भावना अधिक बळकट झाली आहे. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य अधिक जोमाने राबविण्यात येईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# जीवन विकास शिक्षण मंडळ,केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे आयोजन,शुभारंभ ह.भ.प.प्रणव महाराज पटवारी व ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने होणार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील जीवन विकास शिक्षण मंडळ संचलित स्व.विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे दि.२० एप्रिल २०२६ ते दि.२६ एप्रिल २०२६ या कालावधीत स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये सायंकाळी ७:०० ते ८:३० या वेळेच्या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.या व्याख्यानमालेने या वर्षी २६ व्या वर्षात पदार्पण केले आहे.ही व्याख्यानमाला श्रोत्यांच्या मनाला, बुध्दीला आणि आत्म्याला स्पंदित करुन स्फुर्ती,प्रेरणा,जिद्द, सामर्थ्य,उत्साह तसेच ध्येयांचे पर्व निर्माण करणारी ठरत आहे.तरी जास्तीत जास्त श्रोत्यांनी या व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळाचे संचालक, संयोजक व सर्व शिक्षक, प्राध्यापक वृंद यांनी केले आहे.यावर्षी व्याख्यान मालेचा शुभारंभ दि.२० एप्रिल २०२६ वार सोमवार रोजी माजलगाव येथील कवी, लेखक,प्रबोधनकार ह.भ.प.प्रणव महाराज पटवारी व केज येथील ह.भ.प.केशव महाराज शास्त्री,भगवान श्रीकृष्ण आश्रम,बीड रोड केज यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने होणार आहे.या दिवशी माजलगाव येथील कवी, लेखक,प्रबोधनकार, ह.भ.प.प्रणव महाराज पटवारी यांचे वर्तमान युगातील संतवाङ्मयाची प्रासंगिकता या विषया वर व्याख्यान होणार आहे.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ह.भ.प. केशव महाराज शास्त्री भगवान श्रीकृष्ण आश्रम बीड रोड केज हे उपस्थित राहणार आहेत.दि.२१एप्रिल रोजी प्रमुख व्याख्याते श्री. उदय देवळाणकर,शेती व पर्यावरण अभ्यासक, छत्रपती संभाजीनगर विषय-शेती आणि माती अध्यक्ष- रमाकांत कुलकर्णी ( बापू ) लेखक तथा जल अभ्यासक, लातूर.दि.२२ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- डॉ. मधुश्री संजीव सावजी छत्रपती संभाजीनगर, अखिल भारतीय मंत्री, विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान विषय-महिला सक्षम असतातच..!अध्यक्षा- सौ.दिपाली काटे प्रवचनकार तथा ज्ञानेश्वरी अभ्यासक,



रामकृष्ण परमहंस परिवार,केज दि.२३ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- डॉ.राम जावळे,रोग प्रतिबंधन तज्ञ तथा जनरलसर्जन,जिजामाता आरोग्यालय,हॉस्पिटल लातूर,विषय आपले आरोग्य आपल्या हाती कसे घ्यावे ? अध्यक्ष- डॉ.दिनकर राऊत बालरोग तज्ञ,योगिता हॉस्पिटल केज दि.२४ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- प्राचार्य सोमनाथ रोडे विभागीय अध्यक्ष, मराठवाडा जनता विकास परिषद,छत्रपती संभाजीनगर विषय- जाती तोडो भारत जोडो अध्यक्ष- दगडू दादा लोमटे कार्यकारिणी सदस्य,मराठवाडा साहित्य परिषद,छत्रपती संभाजीनगर दि.२५ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- श्री.बापू सर्वगोड लेखक, दिग्दर्शक,चित्रपट प्रशिक्षक,मुंबई विषय- भारतीय चित्रपट सृष्टी : बदलती निर्मिती आणि प्रेक्षकांच्या अभिरुचीचा प्रवास अध्यक्ष- प्रविण जी देशपांडे संचालक, दि.वैद्यनाथ अर्बन को- ऑप बँक लि.परळी वैद्यनाथ,दि.२६ एप्रिल- प्रमुख व्याख्याते- श्री. विलास बडे सहसंपादक, न्यूज १८ मराठी मुंबई विषय- युद्धजन्य परिस्थितीत माध्यमांची भूमिका अध्यक्ष- सुहास सरदेशमुख विशेष प्रतिनिधी दै.लोकसत्ता, छत्रपती संभाजीनगर.

सदरील व्याख्यानमालेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे संचालक मंडळ तसेच सर्व शिक्षक,प्राध्यापक व कर्मचारीवृंद, स्व.प्रमोद महाजन कनिष्ठ महाविद्यालय,स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक,प्राथमिक, स्वयंअर्थसहाय्यित, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल, केज जि.बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077